

# शासनाच्या विविध कल्याणकारी योजना
# तुमच्यासाठी, तुमच्या कुटुंबांसाठी

**प्रिय नागरीक,**

समाजातील अंतिम घटकाचा विकास व्हावा, यासाठी शासन अनेक योजना, उपक्रम राबवित असते. **या प्रक्रियेत सर्वात महत्वाचा टप्पा आहे तो म्हणजे त्या योजनांची माहिती शेवटच्या घटकाला होणे. याच हेतूने शासकीय योजनांची माहिती व्यक्तिअनुरुप पोहोचविण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. यांनी संयुक्तपणे महालाभार्थी वेबपोर्टलची निर्मिती केली आहे. आपण गरजेनुसार आवश्यक माहिती भरून योजनांसाठी आपली पात्रता पडताळून पाहू शकतात. या योजना कोणत्या, त्यात कोणता लाभ मिळतो, त्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, कुणाशी संपर्क करायचा याची संपूर्ण माहिती या वेबपोर्टलवर आहे.** या संबंधीचे माझ्या स्वाक्षरीसह एक पत्र आपणास या संकेतस्थळावर मिळेल. विविध योजनांचे विहित नमुन्यातील अर्ज आणि त्यासंबंधीचे शासन निर्णयसुद्धा उपलब्धतेनुसार डाऊनलोड करता येतील.

योजनांसाठी आपण इच्छुक असल्यास योग्य त्या कागदपत्रांसह अर्ज करावा, योजनांसाठी आपली अंतिम पात्रता संबंधित विभागाचे अधिकारी निश्चित करतील. **आमचे सर्व अधिकारी अत्यंत पारदर्शकपणे या प्रक्रियेमध्ये आपणास योग्य ते सहकार्य करतील याची ग्वाही मी आपणास देतो.**

नागरिकांच्या आणि पर्यायाने आपल्या राज्याच्या विकासामध्ये विविध शासकीय योजना महत्वाच्या भूमिका बजावत असतात. ‘महालाभार्थी’ वेबपोर्टलसारख्या डिजिटल माध्यमातून अशा विविध योजनांचे लाभ योग्य त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम आणखी सुकर होणार आहे. आपण या सुविधेचा जरूर लाभ घ्यावा, तसेच आपल्या परिसरातील डिजिटली निरक्षर असणाऱ्या गरजू होतकरू नागरिकांची आपण ‘महालाभार्थी’ या वेबपोर्टलवर नोंदणी करून द्यावी असे मी आपणास आवाहन करतो. यामुळे विविध शासकीय योजनांसाठी संभाव्य लाभार्थ्यांची माहिती शासनाकडे येण्यास मदत होणार आहे. योग्य त्या लाभार्थ्याला अंतिम लाभ मिळवून देण्यासाठी शासकीय अधिकारीसुद्धा याकामी पुढाकार घेणार आहेत. आपण सर्वजण मिळून सर्वांच्या विकासासाठी एकजुटीने प्रयत्न करूया व ‘महालाभार्थी’ वेबपोर्टलची (cmo.maharashtra.gov.in किंवा www.mahalabharthi.in ) सुविधा महाराष्ट्रातील सर्व नागरिकांपर्यंत पोहोचवूया.

**या लोककल्याणकारी उपक्रमात आपल्या बहुमूल्य सहकार्याच्या अपेक्षेसह....**

आपला

देवेंद्र फडणवीस,

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य